पी. शंकर

भारत सरकार
केन्द्रीय दक्षता आयुक्त.

Government of India
Central Vigilance Commissioner

केन्द्रीय दक्षता आयुक्त
सतर्कता भवन
जीपीओ संकुल
ब्लॉक - ओ, आयएनए,
नवी दिल्ली-११००२३
दूरध्वनी : २४६५१०२०(कार्यालय) २३३८४८१५ (घर)
फॅक्स : ९१-११-२४६५१००९

## प्रस्तावना

सार्वजनिक सेवांमधील भ्रष्टाचार निर्मूलनाच्या कार्यातील स्वयंसेवी संस्थांचा सहभाग (भूमिका) दुय्यम लेखता येणे शक्य नाही. अत्यंत सावध, दक्ष आणि उत्साही नागरिकांनी किंवा नागरिक संस्थानी सरकारी कर्मचारांच्या भ्रष्ट प्रथा उघडया पाडून , नागरिकांत त्याबाबत जागरुकता वाढविल्याची अनेक उदाहरणे आपल्याकडे आहेत. दि कौन्सिल फॉर क्लिन इंडिया (सीसीआय) (-स्वच्छ भारतासाठी परिषद) या संस्थेची निर्मिती आयोगातर्फेदि. १.७.२००१ रोजी करण्यात आली आहे. या संस्थेला कृतीप्रवण करुन ती अधिक मजबूत करण्याची आवश्कता आहे. या परिषदेत सहभागी संस्था आणि व्यक्तींच्या सूचनांची आयोगाला अपेक्षा आहे. ही परिषद म्हणजे एक गैरसरकारी संस्था असल्याने आयोगातर्फे या संस्थेच्या कामात एका मर्यादेपलीकडे पुढाकार घेणे शक्य नाही. या संस्थेतील गैरसरकारी सदस्यानी , आयोगाची या कार्याविषयीची कळकळ आणि सदिच्छा यांच्या आधारे पुढाकार घेणे अपेक्षित आहे. त्यासाठी आयोगावर अवलंबून न राहणे योग्य ठरेल.

कौन्सिल फॉर क्लिन इंडिया तर्फे २००१ मध्ये संस्थेच्या स्थापनेवेळी प्रसिद्ध करण्यात आलेल्या 'भ्रष्टाचार निर्मूलनासाठी नागरिकांचा मार्गदर्शक' यातील तपशील या पुस्तिकेत सारांशरुपाने प्रसिद्ध करून भारतातील बीएएसएफ समुहाने आपल्या समाजातील या गंभीर रोगाचा सामना करण्याविषयाची त्यांची बांधिलकी प्रगट केली आहे. या कार्याला आपल्या सामाजिक दायित्व प्रकल्पात स्थान देऊन बीएएसएफने प्रगट केलेल्या निष्ठेची प्रशंसा शब्दातीत आहे. बीएएसएफने घालून दिलेल्या या उदाहरणाचे अनुकरण अन्य गैरसरकारी संस्था आणि कंपन्या करतील अशी आयोगाला आशा आहे. यातूनच एक स्वच्छ राष्ट्र म्हणून भारताची प्रतिमा जगात निर्माण होईल आणि भ्रष्टाचार निर्मूलनाच्या आंदोलनास बळ मिळेल. या आंदोलनास एक प्रभावी साधन मिळेल आणि त्याचे सुपरिणाम आपल्याला मिळतील.

**(पी. शंकर )**
केन्द्रीय दक्षता आयुक्त

# भ्रष्टाचार मापन निर्देशांक २००३

## सर्वात कमी ते सर्वाधिक भ्रष्ट यानुसार सूची

१. फिन्लंड
२. आइसलँड
३. डेन्मार्क
४. न्युझिलंड
५. सिंगापूर
६. स्वीडन
७. नेदरलॅण्डस
८. ऑस्ट्रेलिया
९. नॉर्वे
१०. स्विट्झर्लंड
११. कॅनडा
१२. लक्झेम्बर्ग
१३. युनायटेड किंगडम
१४. ऑस्ट्रिया
१५. हाँगकाँग
१६. जर्मनी
१७. बेल्जियम
१८. आयर्लंड
१९. युएसए
२०. चीली
२१. इस्रायल
२२. जपान
२३. फ्रान्स
२४. स्पेन
२५. पोर्तुगाल
२६. ओमान
२७. बहारिन
२८. सायप्रस
२९. स्लोव्हेनिया
३०. बोट्सवाना
३१. तैवान
३२. कतार
३३. इस्टोनिया
३४. उरुग्वे
३५. इटली
३६. कुवेत
३७. मलेशिया
३८. युनायटेड अरब अमिरात
३९. ट्युनिशिया
४०. हंगेरी
४१. लिथुआनिया
४२. नामिबिया
४३. क्युबा
४४. जॉर्डन
४५. त्रिनिदाद आणि टोबॅगो
४६. बेलिझे
४७. सौदि अरेबिया
४८. मॉरिशस
४९. दक्षिण अफ्रिका
५०. कोस्टा रिका
५१. ग्रीस
५२. दक्षिण कोरिया
५३. बेलारुस
५४. ब्राझील
५५. बल्गेरिया
५६. झेक रिपब्लिक
५७. जमैका
५८. लाटव्हिया
५९. कोलंबिया
६०. क्रोएशिया
६१. एल सल्वाडोर
६२. पेरु
६३. स्लोव्हाकिया
६४. मेक्सिको
६५. पोलंड
६६. चीन
६७. पनामा
६८. श्रीलंका
६९. सिरिया
७०. बोस्निया & हरझेगॉव्ह
७१. डॉमिनिकन
७२. इजिप्त
७३. घाना
७४. मोरोक्को
७५. थायलंड
७६. सेनेगल
७७. तुर्कस्तान
७८. आर्मेनिया
७९. इराण
८०. लेबेनॉन
८१. माली
८२. पॅलेस्टाइन
८३. भारत
८४. मालावि
८५. रोमानिया
८६. मोझांबिक
८७. रशिया
८८. अल्जेरिया
८९. मादागास्कर
९०. निकारग्वा
९१. येमेन
९२. अल्बानिया
९३. अर्जेन्टिना
९४. इथियोपिया
९५. गांबिया
९६. पाकिस्तान
९७. फिलिपाइन्स
९८. टान्झानिया
९९. झांबिया
१००. ग्वाटेमाला
१०१. कझाकिस्तान
१०२. मोलडोव्हा
१०३. उझबेकिस्तान
१०४. व्हेनेझुअेला
१०५. व्हिएतनाम
१०६. बोलिव्हिया
१०७. होंडुरस
१०८. मॅसेडोनिया
१०९. सर्बिया आणि मॉन्टेनी
११०. सुदान
१११. युक्रेन
११२. झिंबाब्वे
११३. कॉन्गो
११४. इक्वेडॉर
११५. इराक
११६. सिएरा लेऑन
११७. युगांडा
११८. कॉट डिल्व्हॉयर
११९. किर्गीझस्तान
१२०. लिबिया
१२१. पापुआ न्यू गिनी
१२२. इंडोनिशिया
१२३. केनिया
१२४. अंगोला
१२५. अझरबैज़ान
१२६. कॅमेरुन
१२७. जॉर्जिया
१२८. ताजकिस्तान
१२९. म्यानमार
१३०. प्राग्वे
१३१. हैती
१३२. नायजेरिया
१३३. बांगलादेश

**एखादा नागरिक भ्रष्टाचाराविरोधी संघर्ष कसा करू शकतो ?**

एखादा नागरिक किंवा एकत्र आलेल्या नागरिकांचा गट पद्धतशीरपणे आणि नेमकेपणाने भ्रष्टाचार विरोधी संघर्ष कसा करू शकतात यासाठी योग्य तो आधार (माहिती) देण्यासाठी हा मजकूर तयार करण्यात आला आहे. यामुळे भ्रष्टाचार विरोधी संघर्ष करून अन्य देशांनी जसा भ्रष्टाचार नष्ट केला त्याप्रमाणे भारतालाही भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी करण्यात यश मिळू शकेल हे स्पष्ट होईल. आज अस्तित्वात असलेल्या भ्रष्टाचारला कसे तोंड द्यायचे यासंबंधी मार्गदर्शक माहिती देणे हीच या मार्गदर्शकाची मध्यवर्ती कल्पना आहे. भ्रष्टाचार-मुक्त भारताचे स्वप्न वास्तवात उतरविण्यासाठी काही विशिष्ट कृतीसुद्धा यात सुचविण्यात आल्या आहेत.

# कृती करा,
# कृती करण्यास विलंब नको !

## पायरी १ : वैयक्तिक निष्ठा

आपल्यासमोर समस्या उभी राहिली की त्यावर त्वरित उपाय शोधण्याकडे आपला कल असतो. कधी यासाठी आपण रांग मोडतो किंवा नियम मोडतो किंवा कधी आर्थिक लाभ मिळविण्यात सामील होतो. भ्रष्टाचाराविरुद्ध संघर्ष करू इच्छिणाऱ्या नागरिकाने प्रथमत: स्वत: प्रामाणिक असणे आवश्यक आहे.

'प्रामाणिकपणाइतका अन्य कोणताही वारसा अमूल्य नाही'

विल्यम शेक्सपियर

''एकेका व्यक्तीचे नैतिक उत्थान अखेरीस राष्ट्राचे नैतिक उत्थान करत असते; राष्ट्रीय सुबत्तेची हीच गुरुकिल्ली आहे.''

एखादा नागरिक जेंव्हा तक्रार दाखला करतो तेंव्हा त्या व्यक्तीने आपली ओळख उघड करण्याचे धैर्य दाखवायला हवे अन्यथा खोट्या तक्रारी करून धमकवण्याची कुप्रथा बळावते. तसेच, सरकारी कर्मचाऱ्याविरुद्ध खोटी तक्रार करणे हा भारतीय दंड संहिता कलम १८२ अन्वये दंडनीय अपराध आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे.

## पायरी २ : जागरूकता प्रसार

या संघर्षातील दुसरी पायरी म्हणजे भ्रष्टाचाराच्या घातक परिणामांविषयी जागरूकता वाढविणे. आपल्या देशाच्या व्यवस्थेत व्यापक भ्रष्टाचार आढळतो. यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे राजकारणातील भ्रष्टाचारापासून सुरू होणारे, नोकरशाहीतील भ्रष्टाचार, व्यवसायातील भ्रष्टाचार आणि राजकारणाचे गुन्हेगारीकरण हे दुष्टचक्र होय.




भ्रष्टाचारामुळे किंवा सार्वजनिक जीवनात विश्वसनीयतेचा अभाव यामुळे होणाऱ्या हानीविषयी नागरिकांत पुरेशी जाण नसणे हीच खरी समस्या आहे. पिण्याचे पाणी किंवा निवारा किंवा रोजगाराच्या संधी यासारख्या गोष्टी उच्च प्राधान्याच्या आहेत असं मानणारा मतदार भ्रष्टाचार बंद झाला तर या गोष्टी अधिक परिणामकारकपणे हाताळता येतील आणि या समस्या सोडविण्यामध्ये भ्रष्टाचाराचाच कसा मोठा अडथळा होतो याविषयी कदाचित त्याला नीटसे कळत नाही.

## पारदर्शकतेची आवश्यकता :

भ्रष्टाचाराची समस्या सोडविण्यासाठी भ्रष्टाचाराच्या घातक परिणामांविषयी आम जनतेत व्यापक जागृती निर्माण करणे हा एक मार्ग आहे. ही जागृतता वाढविण्यासाठी लोकांच्या विशिष्ट समस्यांचा अभ्यास करून त्या सोडविण्यामध्ये भ्रष्टाचाराचा अडथळा कसा येतो हे पुढे आणणे आवश्यक आहे.

## भ्रष्टाचारविषयक अभ्यास :

- दि पब्लिक अफेअर्स सेंटर, बेंगलोर यांच्यातर्फे डॉ. सॅम्युअल पॉल यांनी बेंगलोरमधील शहरी प्रशासनाविषयी आणि त्या कार्यालयातील भ्रष्टाचारविषयक एक ''रिपोर्ट कार्ड'' (निदर्शक) अहवाल तयार केला आहे.
- सरकारी संस्थांचा भ्रष्टाचार आकलन निर्देशांकाच्या आधारे क्रमवारी लावण्यासाठी माहिती संकलित करणे यासारखा एक कार्यक्रम गैरसरकारी संस्था किंवा आवश्यक साधन सुविधा असलेला एखादा नागरिकही हाती घेऊ शकेल.

## पायरी ३ : सीव्हीसी आणि अन्य भ्रष्टाचार प्रतिबंध एजन्सीजची मदत घेणे

भ्रष्टाचार विरोधी संघर्ष करू इच्छिणाऱ्या नागरिकासमोर उभा राहणारा सर्वात पहिला प्रश्न म्हणजे आपल्याला लाच मागितल्यास नेमकी काय कृती करायची किंवा लाचखोरीचा प्रसंग समोर आल्यास त्याला कसे तोंड द्यायचे.

## १. केन्द्रीय दक्षता आयोग (सीव्हीसी) :

भारत सरकारच्या संस्थांमधील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी सीव्हीसी ही संस्था तयार करण्यात आली आहे. भारत सरकारच्या संस्थांना असे निर्देश देण्यात आले आहेत की, प्रत्येक कार्यालयात, 'लाच देऊ नये आणि लाच मागण्याबात कोणतीही तक्रार करावयाची असेल तर त्यांनी मुख्य दक्षता अधिकाऱ्यांकडे खालील ठिकाणी तक्रार करावी' :

http://cvc.nic.in

केन्द्रीय दक्षता आयोग
सतर्कता भवन,
जीपीओ कॉम्प्लेक्स,
आयएनए
नवी दिल्ली - ११० ०२३
दूरध्वनी : ९१-११-२४६५१००१-८
इमेल : vigilance@hub.nic.in

**संपर्क व्यक्ती :**

केन्द्रीय दक्षता आयुक्त : पी. शंकर
मेल : cvc@alpha.nic.in
दक्षता आयुक्त : एच. जे. डोरा
मेल : vc1@cvc.delhi.nic.in
दक्षता आयुक्त : जानकी वल्लभ
मेल : vc2@cvc.delhi.nic.in

## २. राज्य सरकारांच्या बाबतीत खालील ठिकाणी तक्रार करता येईल.

- ॲन्टीकरप्शन ब्युरो
- लोक आयुक्त
- दक्षता आयुक्त

### त्याचप्रमाणे खालील एजन्सींशी संपर्क साधता येतो.

| संस्था | पता | फोन |
|---|---|---|
| लोकायुक्त, महाराष्ट्र सरकार | नवीन प्रशासकीय इमारत मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२. | (०२२)-२२०२३८२२ |
| लोकायुक्त, एनसीटी चे नवी दिल्ली शासन | जी-ब्लॉक, पहिला मजला, विकास भवन नवी दिल्ली. | (०११)-२३३७०५७० |
| दक्षता आयुक्त पश्चिम बंगाल सरकार | बिकास भवन, सॉल्ट लेक, पहिला आणि दुसरा मजला, कोलकोता - ७०० ०९१. | (०३३)-२३३४०५०६ |
| दक्षता आयुक्त तमिळनाडू सरकार | तामिळनाडू शासन, सचिवालय, चेन्नई - ६०० ००९. | (०४४)-२५६७१५४८ |
| अंण्टी करप्शन ब्युरो | मधुर इन्डस्ट्रियल इस्टेट, पहिला मजला, पांडुरंग बुधकर मार्ग, सेंच्युरी मिल समोर, परळ, मुंबई - ४०० ०१८. | (०२२)-२४९२१२१२<br>(०२२)-२४९२२६१८ |
| पब्लिक कन्सर्न फोर गव्हर्नन्स ट्रस्ट | रूम नं. ५, कुमारग, १०, वरळी सीफेस, गुलिता ट्रेडिंग सेंटर शेजारी, वरळी, मुंबई - ४०० ०१८. | (०२२)-२४९७२७५२ |
| सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (सी बी आय) | तन्ना हाऊस, ११/अ, नाथालाल पारीख मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ०३९ | (०२२)-२२८४२८१६<br>(०२२)-२२०२१४७३ |

## ३. भारत सरकारची आणखी एक एजन्सी म्हणजे सेन्ट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन (सीबीआय) :


कोणत्याही अनुचित मागणीविषयी किंवा स्वीकाराबाबत त्वरित संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी अथवा तोंडी तक्रार नोंदवा - केन्द्र सरकारच्या अधिकाऱ्यांबाबतीत अशी तक्रार सीबीआयकडे नोंदवा तर राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांबाबत अशी तक्रार राज्याच्या ॲन्टी करप्शन ब्युरो यांच्याकडे तक्रारीच्या स्वरूपात नोंदवा. तसेच संबंधित सरकारी कर्मचाऱ्यावर कायदेशीर कारवाईची मागणी करा. यासाठी सदर अधिकाऱ्याला रंगेहाथ पकडण्यासाठी योग्यतो सापळा रचण्याचा आग्रह धरा. त्यामुळे लाच मागणी करताना किंवा स्वीकार करताना त्यांना पकडता येईल.

**अन्य कारवाई :**

### सीएफसीआय (कॉन्सिल फॉर अ क्लिन इंडिया) प्रत्यक्ष साखळी स्वरुपात

भ्रष्टाचारविरोधी संघर्ष करू इच्छिणाऱ्या व्यक्ती किंवा गैर सरकारी संस्थांना एकत्र आणणे आणि एक व्यासपीठ उपलब्ध करून देणे हे सीएफसीआयचे मूलभूत उद्दिष्ट आहे. सीएफसीआय ही अधिकृतरित्या नोंदणी झालेली सोसायटी किंवा कंपनी किंवा महामंडळ नाही तर ती एक प्रत्यक्ष संघटना आहे. सीएफसीआयची माहिती http://cvc.nic.in/vscvc/cfci.htm या वेबसाईटवर प्रसिद्ध केली जाते.

# भ्रष्टाचारविरोधी संघर्ष म्हणजे समृद्ध भारताकडे वाटचाल !




भ्रष्टाचारनिर्मूलनाचे फायदे

भ्रष्टाचाराचे तोटे

**निष्कर्ष :**

अखेरीस तैत्तरिय उपनिषेदात म्हटल्याप्रमाणे,

**सहनाववतु सहनौभुनक्तु सहविर्यम करवावहै**

**तेजस्विनाम अधितमस्तु मा विद्विषावहै, ओम शान्ति, शान्ति, शान्ति**

चला आपण एकत्र येऊ,
चला एकत्र आनंद साजरा करू,
चला आपली सर्वांची शक्ती एकवटू,
ज्ञानाचा प्रकाश पसरू दे,
गैरसमजुतीचे किंवा द्वेषाचे विष नष्ट करू.

**याच मार्गाने आपण भ्रष्टाचाराचे निर्मूलन करून भारताला निश्चितपणे उज्ज्वल भविष्याकडे अग्रेसर करू शकू.**

---

# ही बांधिलकी तुमची, तुमच्याशीच !

मी ही पुस्तिका वाचली असून, माझा या आंदोलनाला पाठिंबा आहे.
मी खालील कृती करीन :

---

---

---

नाव ---

पत्ता ---

---

सही ---

दिनांक ---